# ई - पोलीस पत्रिका

दि २२/०२/२०२४ अनु.क्र.३६

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू

## भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

### रजा

**०१.पोआअ/आस्था-५/सेनिकर्म/रोखीकरण/१८१६/२०२४अमरावती शहर दिनांक १५/०२/२०२४**

### आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेला नियतवयोमानानुसार शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे सेवासमाप्तीच्या दिनांकास त्यांच्या अर्जित रजा लेख्यात शिल्लक असलेल्या एकुण अर्जित रजेचे (कमाल मर्यादा ३०० दिवस मर्यादेत) नमुद विद्यमान वेतनाप्रमाणे त्यांचे अंतिम अर्जित रजेचे रोखीकरण महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६८ (१) व शासन निर्णय, वित्त विभाग,क्रं.अरजा/२४०१/सेवा-९,दिनांक १५/१/२००१मधील परिच्छेद २(२)(एक)तरतुदीनुसार मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम/ब.क्र./नेमणुक | सेवानिवृत्त दिनांक | शिल्लक अर्जित रजा | अंतिम वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पोहवा/६९५, राजेंद्र भाउराव डोंगरे (पोलीस मुख्यालय) | दि.३१/०१/२०२४ | ३०० दिवस | ४४९००/- |
| २ | श्रेपोउपनि/१४०, सुरेश पांडुरंग डबरे (पोस्टे.नागपुरी गेट) | दि.३१/०१/२०२४ | ३०० दिवस | ५११००/- |
| ३ | पोहवा/५७५, दिनेश केशवराव म्हाला (पोलीस मुख्यालय) | दि.३१/०१/२०२४ | ३०० दिवस | ४७६००/- |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त पोलीस अंमलदार यांना त्यांचे रजेचे खात्यामध्ये वरिल प्रमाणे शिल्लक अर्जित रजेचे रोखीकरण मंजुर करण्याची ही प्रथम वेळ असुन यापूर्वी त्यांना रोखीकरण मंजुर व प्रदान करण्यात आलेले नाही. सदरचा खर्च @PENSION OF OTHER RETIRMENT BENEFITS २०७१०५९८-११५ ENCASHMENT BENEFITS लेखा शिर्षातुन भागविण्यात यावा.

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१. पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/चापोहवा-७१८ सावरकर/१५१३/२०२४अमरावती शहर दिनांक १२/०२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ४७०९/२०२३, दिनांक २५/०९/२०२३ गैरहजर कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/का.दा.नो/ चापोहेकॉ-७१८ सावरकर/११८८९/२०२३ अमरावती शहर, दिनांक २७/१०/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** चालक पोहेकॉ/७१८ विनोद सावरकर, नेमणुक पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही चालक पोहेकॉ/७१८ विनोद सावरकर, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहरयेथे नेमणुकीस असुन गणेशोत्सव-२०२३ महत्वाचा बंदोबस्त सुरु असतांना पोलीस स्टेशन गाडगे नगर हद्दीत उपोषण, धरणे आंदोलन असे विविध बंदोबस्त पहाता वाहन चालकांची अत्यंत गरज असतांना तुम्ही पोलीस स्टेशन ला कोणतीही पुर्व सुचना न देता व जाणीवपुर्वक दिनांक २१/०९/२०२३ पासुन ते दिनांक ०२/१०/२०२३ पर्यत अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन याबाबत पोलीस स्टेशन गाडगे नगर ला साना क्र. ०५९/२०२३, दिनांक २१/०९/२०२३ रोजीचे २३.५३ वा.नोंद घेण्यात आलेली आहे.तुम्ही अति महत्वाचा बंदोबस्त सुरु असतांना तुम्ही तुमचे कर्तव्य टाळण्याच्या दृष्टीने जाणीवपुर्वक अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले आहे.तुमच्या अश्या स्वरुपाचे वर्तणुकीवरुन व जाणीवपुर्वक व हेतुपुरस्परपणे कर्तव्य टाळण्याच्या उदेशाने गैरहजर राहिले असुन तुम्ही वरिष्ठाना कोणतीही माहिती दिली नाही, लेखी सुध्दा कळविले नाही. तुम्हाला नेमणु दिलेल्या कर्तव्यावर न जाता व वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विगाभा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले.तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का ? रोखण्यात येवु नये म्हणुनकारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक ३०/०१/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे म्हणणे ऐकुण घेतले असुन व सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी /गैरहजर/पोशि-१८६२ धनकर/१५११/२०२४अमरावती शहर दिनांक १२/०२/२०२४**

# आदेश

खालील नमुद पोलीस अमंलदार हे शहर वाहतुक शाखा (पश्चिम), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे. या कार्यालयात गैरहजर कसुरी अहवाल प्राप्त झाला आहे. प्राप्त गैरहजर कसुरी अहवालाचे अवलोकन केले असुन कसुरीच्या अनुषंगाने तुम्हाला दिनांक ३१/०१/२०२४ रोजी तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेण्यासाठी मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही तुमचे मौखीक म्हणणे मा.पोलीस उपायुक्त (मुख्या), अमरावती शहर यांचे समक्ष सांगीतले असुन, तुमचे म्हणणे ऐकुण घेवून घेतले असुन तुमचे म्हणणे (स्पष्टीकरण) समाधानकारक नसल्याने व तुम्ही परस्पर कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहुन बेशिस्तपणाची गैरवर्तणुक केली असल्याने सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोकॉ/१८६२ अमित धनकर | शवाशा(प) अम.शहर | पोलीस मुख्यालय येथे उजळणी कोर्स करीता असलेले अंमलदार दिनांक ०७/१०/२०२३ रोजी १०:०० वाजता आरोपी कोर्ट पेशी कर्तव्य नेमले असता कर्तव्यावर गैरहजर राहिले. | दिनांक ०७/१०/२०२३ पासुन ते दिनांक ११/१०/२०२३ पर्यत एकुण ०५ दिवस गैरहजर राहिले. | **एकुण १३ दिवस असाधारण रजा** |
| | | | दिनांक ०४/०७/२०२३ चे ०९/०० ते २१/०० वाजता पर्यंत गांधी चौक कर्तव्य लावण्यात आले असता कर्तव्यावर वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. दिनांक ११/०७/२०२३ चे २०/३० वा कर्तव्यावर हजर झाले. | दिनांक ०४/०७/२०२३ पासुन ते दिनांक ११/०७/२०२३ पर्यत एकुण ०८ दिवस गैरहजर राहिले.<br><br>**एकुण ०५+०८ = १३ दिवस गैरहजर.** | |

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी /गैरहजर/अंतिम आदेश/पोशि-८५ देशमुख/१५१४/२०२४अमरावती शहर दिनांक १२/०२/२०२४**

## **आदेश**

**संदर्भ क्रमांक** :- १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ९९६/२०२३, दिनांक १०/०४/२०२३ रोजीचा कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/पोकॉ-८५ देशमुख/६८८१/२०२३ अमरावती शहर, दिनांक १५/०६/२०२३.

**कसुरदारचे नाव :-**पोकॉ/८५ अमोल देशमुख, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोकॉ/८५ अमोल देशमुख, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक ०५/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा.गणणेवर वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन गैरहजर होते.तसेच तुम्ही डयुटी दरम्यान गैरहजर राहण्याचे सवयीचे असुन तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुनतुम्ही तुमचे कर्तव्यात हलगर्जीपणा/निष्काळजीपणा केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या कर्तव्यावर गैरहजर गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये **?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही दिनांक २१/०६/२०२३ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक ०८/१२/२०२३ व दिनांक ३०/०१/२०२४ रोजी तुमचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकुण घेण्याकरीता मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षेत हजर न होता आज्ञांकित कक्षेत हजर राहिले नसुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

### **अंतिम आदेश**

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## **भाग-३**

## **वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण**

## **वेतन निश्चितीती**

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/वेतन तफावत-३३५/१८९८/२०२४अमरावती शहर दिनांक २०/०२/२०२४**

### **आदेश क्र.०१**

**मपोशि/३३५, मोनाली प्रभाकर मोखडकर, नेमणुक पो.स्टे.सिटी कोतवाली,अमरावती शहर**यांची या कार्यालयाच्या आस्थापनेवर दिनांक १५.०८.२०१४ रोजी पोलीस शिपाई पदावर नेमणुक झालेली आहे. परंतु महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये मुलभुत प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण नसल्याने त्यांना वेतनवाढी मंजुर करण्यात आल्या नाहीत.

**मपोशि/३३५, मोनाली प्रभाकर मोखडकर**, यांनी महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये मुलभुत प्रशिक्षण परिक्षा **दिनांक ३०.०९.२०१६ रोजी उत्तीर्ण केल्याने**त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या ३९ मधील (१) (दोन) व (तिन)मधील तरतुदीच्या अधिन राहून तसेच महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम १५ मधील (१) व (२) या तरतुदीच्या व शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दि.३०.०१.२०१९ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| **विद्यमान वेतन व दिनांक** | | | **सुधारीत देय वेतन व दिनांक** | | |
|---|---|---|---|---|---|
| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन** | | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन** | |
| | **वेतन बँड** | **ग्रेड वेतन** | | **वेतन बँड** | **ग्रेड वेतन** |
| १४/०८/२०१४ | रु. ६४६०/-<br>पोलीस शिपाई | रु.२०००/- | १४/०८/२०१४ | रु. ६४६०/-<br>पोलीस शिपाई | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१५ | रु. ६४६०/-<br>**महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये मुलभुत प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण नसल्याने वेतनवाढ देय नसल्याने काल्पनिकरीत्या देय वेतन. (रु.६४६०+२६०=६७२०/-)** | रु.२०००/- |

## <u>आदेश क्र.(२)</u>

शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ८७२० x२.५७ = २२४१०.४/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन रु.२३१००/- | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ८४६० x२.५७ = २१७४२.२/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन रु.२२४००/-<br>**(रु.८७२०x २.५७= २२४१०.४/- नजीकच्या रुपयात पुर्णांकित करुन रु. २३१००/- काल्पनिकरित्या देय.)** |
| ०१/०७/२०१६ | रु.२३१००/- एस-७<br>**(महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये मुलभुत प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण नसल्याने वेतनवाढ देय नाही.** | ०१/०७/२०१६ | रु.२२४००/- एस-७<br>**(महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये मुलभुत प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण नसल्याने काल्पनिकरीत्या देय वेतन रु.२३८००/- एस-७)** |
| -- | -- | **३०/०९/२०१६** | **रु.२३८००/- एस-७**<br>**(महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये मुलभुत प्रशिक्षण परिक्षा दि.३०.०९.२०१६ रोजी उत्तीर्ण झाल्याने प्रत्यक्ष देय वेतन.)** |

| | | | |
|---|---|---|---|
| ०१/०७/२०१७ | रु.२३८००/- एस-७<br>**दि.३०.०९.२०१६ रोजी परिक्षा उत्तीर्ण झाल्याने देय वोतन.** | ०१/०७/२०१७ | रु.२४५००/- एस-७ |
| ०१/०७/२०१८ | रु.२४५००/- एस-७ | ०१/०७/२०१८ | रु.२५२००/- एस-७ |
| ०१/०७/२०१९ | रु.२५२००/- एस-७ | ०१/०७/२०१९ | रु.२६०००/- एस-७ |
| ०१/०७/२०२० | रु.२६०००/- एस-७ | ०१/०७/२०२० | रु.२६८००/- एस-७ |
| ०१/०७/२०२१ | रु.२६८००/- एस-७ | ०१/०७/२०२१ | रु.२७६००/- एस-७ |
| ०१/०७/२०२२ | रु.२७६००/- एस-७ | ०१/०७/२०२२ | रु.२८४००/- एस-७ |
| ०१/०७/२०२३ | रु.२८४००/- एस-७ | ०१/०७/२०२३ | रु.२९३००/- एस-७ |

दिनांक १४.०८.२०१४ ते ३०.०९.२०१६ पावेतो काल्पनिकरीत्या देय असलेल्या वेतनाची प्रत्यक्ष थकबाकी देय राहणार नाही.तसेच मुलभुत प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण केल्याने दिनांक ३०.०९.२०१६ नंतर दर्शविण्यात आलेले वेतन प्रत्यक्ष देय असेल.

सदरचा वेतनश्चिती आदेश वेतन पडताळणी पथकाचे अंतिम तपासणीचे अधिन राहुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर कर्मचारी यांना उपरोक्त वेतननिश्चिती मुळे भविष्यातअतिप्रदान झाल्यास आढळुन आल्यास त्यांचेकडुन सदरची अतिप्रदान रक्कम वसुल करण्यात येईल.

**२.पोआअ/आस्था-वेनिलि/१जुलै काल्प.वे.वाढ/१८९४/२०२४अमरावती शहर दिनांक २०/०२/२०२४**

## आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दिनांक २८.०६.२०२३ अन्वये जे पोलीस अधिकारी/अंमलदार दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत व ज्यांनी मागील १२ महिन्यांची आर्हताकारी सेवा पुर्ण केली आहे, अशा सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अंमलदारांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक (Notional) वेतनवाढ विचारात घेऊन त्यांचे सेवानिवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्तीविषयक लाभ सुधारीत करण्यात यावेत; तसेच सदर लाभ सुधारीत करण्यात आल्यानंतर सदर कर्मचा-यांनी अर्ज दाखल केलेल्या दिनांकाच्या मागील ०३ वर्षाची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जे कमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी; अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन परिपत्रकानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेवरील दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या सोबतच्या विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०१ जुलैच्या काल्पनिक वेतनवाढीसह सदर विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांचे नावासमोरील **स्तंभ क्र.०७** मध्ये नमूद केलेले वेतन विचारात घेऊन त्यानुसार सेवानिवृत्तीवेतन,सेवानिवृत्ती उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण सुधारीत करण्यात यावे. सुधारीत सेवानिवृत्तीवेतनाच्या थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी विवरणपत्रात **स्तंभ क्र.०९** मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार सदर कालावधीत सेवानिवृत्तीवेतनाच्या फरकाची थकबाकी अदा करण्यात यावी.

सदर काल्पनिक वेतनवाढीनुसार सुधारीत केलेल्या सेवानिवृत्तीवेतन उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण या सेवानिवृत्तीवेतनविषयक लाभांच्या फरकाची थकबाकी यापूर्वी अदा करण्यात आलेल्या रकमेशी समायोजीत करुन अदा करण्यात यावी.

## विवरणपत्र

**दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदार यांना दिनांक 01 जुलै रोजीची काल्पनिक(NOTIONAL) वेतनवाढ. मंजूर करणे बाबत**

| अ.क्र. | पदनाम व बक्कल क्रमांक | दि. 30 जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव | सेवानिवृत्तीचा दिनांक | सेवानिवृत्तीच्या दिनांकाची वेतनश्रेणी | सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन | दि.01 जुलै रोजीच्या काल्पनिक वेतनवाढीनंतर सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन | अर्ज सादर केल्याचा दिनांक | सुधारीत सेवानिवृत्ती वेतनाची थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | सपोउपनि/ रेडीओ यांत्रीकी | सुनील भिवाजी खोब्रागडे | 30.06.2021 | एस-14 : 38600-122800 | रु.55100/- | रु.56800/- | दि. 07.02.2024 | दि.01.07.2021 ते 06.02.2024 |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस